# <u>आपत्ती व्यवस्थापन व सुरक्षा विषयक मार्गदर्शन/प्रशिक्षण</u>

रायगड जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयातील पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच मंत्रालयीन कर्मचारी यांना आपत्ती व सुरक्षा विषयक मार्गदर्शन प्रशिक्षण मा. पोलीस अधीक्षक श्री अनिल पारस्कर यांचे पुढाकाराने आयोजित करण्यात आले. या वेळी रायगड जिल्हयातील प्रसिद्ध आपत्ती व सुरक्षा विषयक तज्ञ श्री जयपाल पाटील यांनी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. सदर वेळी जिल्हा रुग्णालयाच्या वतीने डॉ.जावळे यांनी (108) रुग्णवाहिका संबधित कामकाजाची सविस्तर माहिती देवून प्रत्यक्ष रुग्णवाहिका कामकाजाचे प्रात्यक्षिक दाखविले. या कार्यक्रमात श्री पाटील यांनी जिल्हा वाहतूक शाखा, दामिनी पथक, रुग्णवाहिका 108 यांच्याशि दुरध्वनी वर संपर्क साधून त्यांना पाचारण केले व उपस्थिताना त्यांचे कामकाजाची माहिती देण्यात आली. सदर कार्यक्रमासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयातील सर्व शाखांचे पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच मंत्रालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने हजर होते.






H-14 CL 1047